# नगर परिषद कार्यालय, मलकापूर

प्रशासकीय सर्वसाधारण सभा दि ०१/०२/२०२४

## कार्यवृत्त

**आज दि ०१/०२/२०२४ रोजी सकाळी ११ वाजता मा. प्रशासक महोदय नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या पाणी पुरवठा विभाग यांनी सादर केलेल्या खालील विषयाकरिता प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.**

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| | **पाणी पुरवठा विभाग** |
| **१** | **धुपेश्वर येथील जुने जॅकवेल (पंपिंग स्टेशन) ची दुरुस्ती करणे व नवीन जॅकवेलसह पंप हाऊसची इमारत बांधणे बाबत.** |

**विषय क्र १:- धुपेश्वर येथील जुने जॅकवेल (पंपिंग स्टेशन) ची दुरुस्ती करणे व नवीन जॅकवेलसह पंप हाऊसची इमारत बांधणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून पाणीपुरवठा अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, धुपेश्वर पंपिंग स्टेशन येथील जॅकवेल (८ मी. व्यास खोली २३ मी.) ही जा.क्र. तांशा/मलकापूरपापुयो/५८६/१९८७ दिनांक ०६/०४/१९८७ ला विभागीय अभियंता परिसर अभियांत्रिकी उपविभागम, खामगाव यांचे मार्फत देखभाल व दुरुस्तीसाठी हस्तांतरित करण्यात आलेली आहे. CPHEO MANUAL नुसार पंपिंग स्टेशनचे आयुष्य ३० वर्षे एवढे आहे. सदर नियमानुसार धुपेश्वर येथील पंपिंग स्टेशनचे आयुष्य सन २०१५ रोजी संपलेले आहे. सदर जुने जॅकवेल मोठ्या प्रमाणात क्षतीग्रस्त झालेले असून ते कधीही पडू शकते. मलकापूर शहर नवीन पाणीपुरवठा योजना प्रस्तावित असून त्यात १० मी. व्यासाची रु १,३१,२७,९००/- निधी नवीन जॅकवेल करिता प्रस्तावित असून योजना मंजूर होण्यास बराच कालावधी लागू शकतो. त्यादरम्यान जुनी जॅकवेल ढासळल्यास शहरातील पाणीपुरवठा कायमस्वरूपी विस्कळीत होऊन नगरपालिकेचे पंप, पॅनल यांची आर्थिक हानी तसेच जीवित हानी सुद्धा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे जुनी जॅकवेल दुरुस्ती करणे अत्यंत आवश्यक व तातडीचे असून न.प. प्रशासकीय सभा ठराव क्र. २ दिनांक ११/०३/२०२२ नुसार मंजुरी देखील देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर जॅकवेलचे स्ट्रक्चरल ऑडिट करणे करिता न.प. पत्र क्र. ३२७१/२०२३ दि १९/१२/२०२३ नुसार मा. प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन विद्यालय नांदेड यांना देण्यात आले असता त्यांनी जुन्या जॅकवेलचे स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्ट क्र. GPNDE CED/TPA/२०२४/८९७ दि. ०१/०२/२०२४ नुसार सादर केलेले असून त्यानुसार जुन्या जॅकवेल चा वापर करणे सुरक्षेच्या दृष्टिकोनातून योग्य नाही. तसेच एका वर्षामध्ये पर्यायी व्यवस्था होईपर्यंत जुन्या जॅकवेलची दुरुस्ती करण्यात यावी असे सूचित केलेले आहे. त्यानुसार सध्या अस्तित्वात असलेल्या जॅकवेलची दुरुस्ती करणे व पर्यायी व्यवस्थे करिता जुन्या जॅकवेलच्या बाजूला नवीन जॅकवेल सह पंपहाऊस प्रस्तावित करणे बाबत नमूद केलेले आहे.

तसेच धुपेश्र्वर येथे नवीन जॅकवेल सह पंप हाऊस चे बांधकाम करणेच्या कामास शासन निर्णय क्रं. नगरो- २०१४ / प्र.क्र.-११९ / नवि - ३३ दिनांक २१ ऑगष्ट २०१४ मधील वित्तीय आकृतीबंध नुसार 'ब' वर्ग नगर परिषदेस मंजूर प्रकल्प किंमतीच्या ८५ % शासन हिस्सा व १५ % न. प. हिस्सा राहिल व शासन निर्णयातील पृष्ठ क्रमांक ७ वरील परिच्छेद 'ज' मधील अटी व शर्तीची पूर्तता करणे आवश्यक आहे. सबब ठरविण्यात येते की, शासन निर्णयातील बंधनकारक व वैकल्पीक सुधारणा तसेच पृष्ठ क्रमांक ७ वरील परिच्छेद 'ज' मधील खालील प्रमाणे सुधारणा नगर परिषद वेळेत पूर्ण करेल.

१. व्दीलेखा नोंद पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

२. नगर परिषदेचे कामकाजाचे पूर्ण संगणकीकरण करण्यात येईल.

३. मालमत्ता कर यामध्ये सुधारणा करण्यात येईल.

४. पर्जनजल संचय करण्यात येईल.

५. नगर परिषद कार्यक्षेत्रात पाणी बचतीच्या उपाययोजना राबविण्यात येईल.

६. नगर परिषद कार्यक्षेत्रात उर्जा बचतीच्या उपाययोजना राबविण्यात येईल.

वरील प्रमाणे सुधारणा वेळेत पूर्ण करण्यात येतील व शासन निर्णयानुसार भरावयाचा नगर परिषद हिस्सा (अंदाजपत्रकाच्या १५%) हा १४ वा वित्त आयोग / १५ वा वित्त आयोग / नगर परिषद निधी व आवश्यकता भासल्यास MUINFRA योजनेतून कर्जा मधून निधी उभारण्यात येईल. तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानची Service Level Benchmark उदिष्टे नगर परिषद मलकापूर कडून पूर्ण करण्यात येतील.

वरील सर्व बाबींचा विचार करता ठरविण्यात येते की, पाणीपुरवठा विभाग हे अत्यावश्यक सेवेत येत असून मलकापूर नगर परिषदेच्या पाणीपुरवठा यंत्रणेतील महत्त्वाचे असलेले धुपेश्वर येथील जुने जॅकवेल चे दुरुस्ती करणे व नवीन जॅकवेलचे बांधकाम करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तसेच संबंधित योजनेतून काम करण्यास आवश्यक असलेला नगरपालिकेचा हिस्सा भरण्याकरिता नगरपरिषद तयार आहे. त्यामुळे या कामांचे प्रस्ताव प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारामार्फत तयार करून घेण्यास व येणारा येणारा खर्च महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान राज्यस्तर / १५ वा वित्त आयोग / वैशिट्यपूर्ण निधी / पाणी टंचाई निधी अथवा नगरपालिका निधीतून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

आर.यु. सुरडकर
प्रशासक
नगर परिषद मलकापूर.